## गैरअर्जदारांतर्फे अतिरिक्त सरतपास– श्री. एस. पी. पोवार वकील.

१९. आता मला माझ्या व काजलच्या लग्नाची यादी दाखवली, तिला **नि. क्र.२२** देण्यात येतो. आता मला काजलला वकिलांमार्फत पाठवलेल्या नोटीसीची प्रत आणि त्याबाबतच्या पोस्टाच्या पावत्या दाखवाल्या, त्यांना अनुक्रमे **नि. क्र.२३ ते २५** देण्यात येतात. आता मला मी काजलच्या विरोधात महिला दक्षता समितीकडे दिलेल्या तक्रारीची प्रत दाखवली, तिला **नि. क्र.२६** देण्यात येतो. आता मला सदर समितीसमोर मी दिलेल्या जबाबाची प्रत दाखवली, तिला **नि. क्र.२७** देण्यात येतो. आता मला समिती समोर काजलने दिलेल्या जबाबाची प्रत दाखवली, तिला **वस्तू क्र. अ** देण्यात येतो.

## अर्जदारतर्फे उलटतपास– श्री. जी. जे. पाटील वकील.

२०. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ वकिलांनी तयार केलेल्या शपथपत्रावरती स्वाक्षरी केली आहे. मी, वडिल तानाजी बापू जगताप, आई अंजना तानाजी जगताप, मामे बहिण स्नेहा प्रकाश जाधव असे एकत्र राहतो. माझ्या वडिलांचे नागाव हे मूळ गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल केवळ लग्नासाठी आल्यानंतर पुन्हा नागाव येथे राहायला गेलेले आहेत.

२१. आमचे वडिल नागाव येथे वडिलोपार्जित घरात राहता. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला नागाव येथे तीन एकर बागायती शेतजमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व आई माझ्या वडिलांचा सांभाळ करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना शेतीचे चांगले उत्पन्न मिळते. मी माझ्या शपथपत्रात वडिलांचा सांभाळ करतो असे कथन केलेले नाही. मी संपुर्ण कुटुंब सांभाळत असून वडिलांची माझ्यावरती जबाबदारी असल्यामुळे त्यांचा सांभाळ करतो असा उल्लेख करण्याची मला गरज वाटली नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचे सर्व शासकीय कागदपत्रे नागाव येथील पत्यावरील आहेत.

प्रश्न – केवळ तुमचे, आईचे व स्नेहाचे शासकीय कागदपत्रे रंकाळा, अंबाई टँक या पत्यावरील आहेत ?

उत्तर – आमच्या सर्वांची कागदपत्रे त्याच पत्यावरील आहेत.

**२३.** स्नेहा ही माझ्या आईच्या भावाची मुलगी असून ती कवठेमहांकाळ गावची आहे. तिची आई गृहिणी असून वडिल मयत आहेत. तिला आजरोजी २० वर्षांचा लहान भाऊ आहे. आजरोजी स्नेहाचे वय २३ वर्षे असून आजही आमच्या सोबत राहते. ती वयाच्या दोन वर्षापासून आमच्या सोबत राहत आहे.

**२४.** माझे व काजलचे एकमेकांच्या पसंतीने आमच्या कोल्हापूर येथील घरी ठरवून लग्न झालेले आहे. आमचे लग्न दि.१९.०४.२०२१ रोजी ठरले व दि.०६.०६.२०२१ रोजी झाले तेव्हा कोरोना काळ चालू होता. आमचा साखरपुडा दि.२९.०४.२०२१ रोजी झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो आमच्याकडे करायचे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तो साखरपुडा दि.२९.०४.२०२१ रोजी न करता लग्नाच्या दिवशी केला आहे.

**२५.** नि. क्र.२२ च्या यादीत वधू व वराने काय करायचे याचे दोन रकाने आहेत. त्यातील आम्ही काय करायचे या बाजूमध्ये साखरपुडा दि.२९.०४.२०२१ रोजी करायचे नमूद केले आहे. मी माझ्या शपथपत्रात, लेखी जबाबात साखरपुडा वधूपक्षाने करायचे तोंडी ठरलेले असल्यामुळे लिहिलेले आहे.

प्रश्न – साखरपुडयाबाबतचा तुमच्या जबाबातील, शपथपत्रातील मजकूर बरोबर आहे की तुमच्या नि. क्र.२२ मधील साखरपुडया बाबतचा मजकूर बरोबर आहे ?

उत्तर – माझ्या जबाबातील, शपथपत्रातील आणि नि. क्र.२२ वरील यादीतील मजकूर बरोबर आहे.

(सदर प्रश्नास गैरअर्जदारांच्या वकिलांनी नि. क्र.२२ वरील लग्नकार्य करणेचे आहे याबाबतचा मजकूर एकत्रीत असल्यामुळे तो वेगवेगळा करुन वाचण्यात येत असल्याचा आक्षेप घेतला आहे. सदर बाब युक्तिवादासाठी खुली ठेवून पुढील पुरावा घेण्यात येतो.)

**२६.** हे म्हणणे खरे नाही की, काजलच्या आई व भावाने आम्हाला यादीप्रमाणे मानपान करुन सोन्याचे दागिने व लग्नाचा खर्च दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की,

आम्ही आजीच्या आजारपणाचे कारण सांगून कोरोना असून देखील दि.०६.०६.२०२१ रोजी घाईगडबडीत साखरपुडयासह लग्न करुन घेतले आहे. लग्नानंतर काजल माझ्यासोबत कायझन सोसायटीमधील फ्लॅटमध्ये राहायला आली होती. आमचा अंबाई टँक येथे फ्लॅट असून कायझन येथे भाडयाने घेतलेला फ्लॅट आहे.

२७. लग्नानंतर मी, आई–वडिल, मामे बहिण स्नेहा आणि काजल असे एकत्र राहत होतो. आमच्या लग्नाच्या वेळी स्नेहा १९ वर्षांची असून शहाजी लॉ कॉलेजमध्ये दुस–या वर्गात शिकत होती. स्नेहा बसने कॉलेजला जात होती. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर माझी आई व बहिण स्नेहा काजलला उपहासात्मक टोमणे मारुन, भांडणे करुन तिला लज्जा उत्पन्न करत होते. हे म्हणणे खरे नाही की, ते तिला घरगुती कामाच्या कारणावरुन शारिरीक व मानसिक त्रास देत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत काजलने मला कामावरुन आल्यावर सांगितल्यानंतर मी तिला आई व बहिणीची बाजू घेऊन शिवीगाळी करुन मारहाण करत होतो.

२८. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार आमच्या वागण्यात भविष्यात सुधारणा होईल या आशेने आमचा त्रास सहन करत होती. माझ्या लग्नापूर्वीपासून आमच्याकडे मोलकरीण कामाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नानंतर आम्ही मोलकरणीचे काम बंद केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे घरातील सर्व कामे काजलला करावी लागत होती.

२९. हे म्हणणे खरे नाही की, मी लग्न ठरवताना माझे सहा हॉटेल्स, दोन फ्लॅट व एक पाच गुंठयाचा कोल्हापूर येथे प्लॉट असल्याचे खोटे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी लग्न जमवण्यापूर्वी सैन्यदलात मोठा अधिकारी असल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, काजलला लग्न झाल्यावर मी सांगितलेल्या सर्व बाबी खोटया असल्याचे समजले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी तिचा तिरस्कार करु लागलो होतो.

३०. हे म्हणणे खरे नाही की, मी सैन्यात अधिकारी असल्याचे सांगून लोकांकडून नोकरी लावण्यासाठी पैसे घेत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे लोक पैसे

मागण्यासाठी वारंवार घरी येत असल्यामुळे काजलला त्रास होत होता. हे म्हणणे खरे नाही की, काजल मला चांगला संसार करण्याबाबत सांगत असून देखील मी तिचे ऐकत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आई व बहिणीसोबत संगनमत करुन काजलशी भांडत होतो.

**३१**. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यानंतर काजलला गाडीमध्ये पंचगंगा नदीजवळ नेऊन बुडवून मारण्याची धमकी दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, काजलने तिच्या माहेरी सांगू नये या कारणाने मी तिचा मोबाईल काढून घेत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या विक्षिप्त वागण्यामुळे काजलला शारिरीक व मानसिक त्रास होत होता.

**३२**. हे म्हणणे खरे नाही की, स्नेहा तिच्या मासिक धर्मातील सॅनिटरी पॅड बेडवरती टाकत होती. हे म्हणणे खरे नाही की, काजलने त्याबाबत स्नेहाला समजावून सांगितल्या नंतर मी स्वतः ते पॅड उचलून बाहेर टाकत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही काजलला स्नेहा लहानपणापासून घरात राहत असल्यामुळे तिला काही बोलायचे नाही अशी धमकी देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी व आई काजलने स्नेहाला काही म्हणायचे नाही अशी तिला धमकी देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर काजलने मला व स्नेहाला एकमेकांना जेवणाचा घास खाऊ घालताना पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी काजलला जेवणाच्या ताटावरुन अपमानित करुन हाकलून लावले होते.

**३३**. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही काजलला घरातील कोणत्याही वस्तूंना हात लावू देत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, स्नेहा मला खोटे सांगून माझी व काजलची भांडणे लावून देत होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी काजलला ठार मारण्याची धमकी देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी काजलला जम्मू-काश्मीरला फिरायला नेऊन स्नेहा व घराबाबत काही बोलायचे नाही असे म्हणून शिवीगाळी करुन धमकी दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, काजलने तिच्या आईला कळवू नये यासाठी मी तिचा फोन काढून घेतला होता.

**३४**. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही जम्मू-काश्मीरवरुन आल्यावर काजलने

आणलेल्या सर्व वस्तू तिला न विचारता स्नेहाने काढून घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, काजल माहेरी आजरा येथे आली असता तिचा मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे लागला नसता मी तिला 'तुझा दुसरा फोन आहे व तू तेथे कोणाला ठेवलेस का' अशी शिवीगाळी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर काजलने केलेले फोन मी घ्यायला टाळाटाळ करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी काजलच्या नातेवाईकांना भेटून व फोनवरुन तिची बदनामी करायला सुरुवात केली होती.

**३५**. हे म्हणणे खरे नाही की, मी काजलसोबत वाद झाल्यावर तीला, 'एकवेळ तुला घटस्फोट देईन पण स्नेहाला सोडणार नाही' असे म्हणून तिला ठार मारण्याची धमकी देऊन शारिरीक व मानसिक त्रास दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर माझ्या आईने काजलकडून तिला लग्नात केलेले सर्व दागिने काढून घेऊन कोल्हापूरच्या लॉकरमध्ये ठेवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, काजलने माहेरी जाताना कोणतेही दागिने नेलेले नाहीत.

**३६**. हे म्हणणे खरे नाही की, काजलने तिच्या आई, भाऊ व नातेवाईकां मार्फत आमच्या सोबत मध्यस्थी करण्यासाठी तीन–चार वेळा चर्चा केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी काजलकडे घटस्फोटाची मागणी करुन तिला नांदवण्यास नकार दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही केलेल्या शारिरीक व मानसिक त्रासामुळे काजल तिच्या माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही काजलचा छळ करुन तिला त्रास दिल्यामुळे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहोत.

**३७**. हे म्हणणे खरे नाही की, काजल माहेरी आल्यापासून मी तिच्या दैनंदिन गरजांसह निवासाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही काजलला शारिरीक व मानसिक त्रास देऊन तिचे वैवाहिक जीवन उध्वस्त केले आहे.

**३८**. हे म्हणणे खरे नाही की, माझे निपाणी येथे *मिरची* नावाचे नामांकित हॉटेल असून त्यापासून मला दरमहा ५०,०००/– रुपयांचे उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, माझे कोल्हापूर येथे *फाईन लाईन* नावाचे नामांकित हॉटेल असून त्यापासून मला दरमहा ७५,०००/– रुपयांचे उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, माझा कोल्हापूर

येथे ५ गुंठयाचा प्लॉट असून नागाव येथे वडिलार्जित जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला चांगले उत्पन्न मिळत असल्यामुळे मी काजलला दरमहा ६०,०००/– रुपये पोटगी देऊ शकतो.

**३९**. हे म्हणणे खरे नाही की, काजलला स्वतंत्र असे कोणतेही आर्थिक उत्पन्न नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी काजल हर्बल लाईफ कंपनीसाठी एजंटचे काम करत असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या माझ्या पगाराच्या पावती वरती रजत हॉटेलचा शिक्का आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो, रजत हॉटेलच्या बिल्डींगमध्ये तो काम करत असलेली दि डायरीजचा बार आहे. मी काम करत असलेला बार सुनैना मोरे चालवतात. त्या हॉटेलचा तनवाणी ग्रूपशी संबंध नाही.

**४०**. मी लग्नामध्ये अर्जदाराला १० तोळे सोने दिल्याच्या पावत्या दाखल केलेल्या नाहीत. साक्षीदार पुन्हा सांगतो, तो सोनेखरेदीच्या पावत्या दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, काजलने लग्नाचा प्री–वेडींग व्हीडीओ करण्याची कधीही मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी काजलला नांदवायला नेण्यासाठी नोव्हेंबर २०२१ मध्ये हलकर्णीमध्ये आलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, काजलला नांदवण्यासाठी पुर्वी व त्यानंतर कोणताही प्रयत्न केलेला नाही.

**४१**. हे म्हणणे खरे नाही की, काजल घराच्या चाव्या व मालमत्ता ताब्यात दिल्या तरच बाळाचा विचार करेन असे कधीही म्हणालेली नाही. मला काजल सदर बाब केव्हा म्हणाली होती याची निश्चित तारीख सांगता येणार नाही. मला स्नेहा कधीपासून मैत्रीणी सोबत वेगळी ठेवली होती याची तारीख सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतो, ती जुलै २०२२ मध्ये वेगळी ठेवली होती. सध्या स्नेहा आमच्या सोबत राहत आहे.

**४२**. हे म्हणणे खरे नाही की, मी काजलला तिरुपतीला व पंजाबला नेल्यानंतर शारिरीक व मानसिक त्रास देऊन घरी कळवायचे नाही अशी धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी काजलला तीन वेळा फिरायला नेऊन तिचा धमकी देऊन फोन काढून घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या भीतीमुळे काजलने माझ्या विरोधात त्यावेळी कोणतीही तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी, आई व

स्नेहाने काजलला कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय शारिरीक व मानसिक त्रास देऊन घरातून बाहेर काढले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी काजलचा स्वतःहून त्याग करुन तिला वैवाहिक जीवनापासून वंचित ठेवले आहे.

**४३**. हे म्हणणे खरे नाही की, मी या प्रकरणाची नोटीस मिळाल्यानंतर कोल्हापूर येथे नांदावयास येण्याबाबतचे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ते प्रकरण काजलला त्रास देऊन या प्रकरणाला शह देण्यासह तिला नांदवायचे नसल्यामुळे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, स्नेहाच्या कारणावरुन मला काजलला नांदवायची कोणतीही प्रामाणिक ईच्छा नसल्यामुळे आम्ही संगनमताने तिचा शारिरीक, मानसिक, आर्थिक व सामाजिक छळ केला आहे.

**४४**. मला काजलला सांभाळण्याची माझ्यावरती जबाबदारी असल्याची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मी सांगत असलेल्या पगारापेक्षा इतर मार्गांनी जास्त उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, काजलला सांभाळण्याची जबाबदारी टाळण्यासाठी मी खोटा जबाब व शपथपत्र दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक - १३.०८.२०२५.

(आर. पी. थोरे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.